**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार**

**न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः प्रदिप जयराम महाबळे,

वय:५३ वर्षे, व्यवसायः शेती,

राहणारः पाले बुद्रूक, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. अंदाजे तीन वर्षांपूर्वी पोलीसांनी मला पोलीस स्टेशन, कोलाड येथे बोलाविले होत. तेथे त्यांनी माझी पंचनाम्यावर सही घेतली होती. आता मला दि.२७/०७/२०१७ रोजीचा मेमोरेंडम पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२७/०७/२०१७ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच विशाल विष्णू भालेकर याला पोलीस स्टेशन, कोलाड येथे बोलाविले होते, त्या दिवशी आरोपीने आमचे समक्ष त्याने दि.२७/०७/२०१७ रोजी सायंकाळी ०६.३५ वा. चे सुमारास कुंडलिका नदीवरील रेल्वेपुलाचे कठड्याजवळ थांबून माणगावकडून मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वेमधून उजव्या दरवाजाजवळ उभ्याअसलेल्या व्यक्तीचे हातावर काठी मारली, त्याद्वारे त्याने त्याचे हातातील मोबाईल खाली पाडून त्याची चोरी केली, सदरील मोबाईल ठेवल्याची जागा दर्शविण्याची तयारी त्याने आमचे समक्ष दर्शविली, त्याप्रमाणे पोलीसांनी

शासन वि. राजेश

आमचे समक्ष आरोपीचा निवेदन पंचनामा तयार केला, सदर माहिती आरोपीने दिल्यानंतर तो, पोलीस, मी व दुसरा पंच मिळून आरोपीने दिलेल्या माहितीप्रमाणे आंबेवाडी आदिवासीवाडी येथे गेलो, तेथील त्याचे घरातील बॅगमधून एम आय कंपनीचामोबाईल फोन त्याने आमचे समक्ष काढून दिला, पोलीसांनी सदर मोबाईल फोनचा तपशील लिहून घेवून तेथे मेमोरेंडम पंचनामा तयार केला, सदर दोन्ही पंचनाम्यावर मी वाचून सही केली, त्या दोन्ही पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एन.जी.देशमुख यांनी नाकारला.**

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत,

sunil sakharam mahale

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.05.26 ... +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि.२६.०५.२०२३. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.